सुविदे फाउंडेशन

# कृषी विज्ञान केंद्र,वाशिम

करडा ता.रिसोड जि.वाशिम

ई-त्रैमासीक बातमीपत्र

भाकृअनुप ICAR



## विशेष कापूस पीक प्रकल्पांतर्गत कापूस कृषी मेळावा




भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली तसेच केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या सहकार्याने कृषी विज्ञान केंद्र, वाशिम द्वारे विशेष कापूस पीक प्रकल्पांतर्गत कापूस पीक कृषी मेळावा कार्यक्रम शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी महेश भवन, कारंजा (लाड) येथे यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी बाजार समिती, कारंजा येथील माजी उपसभापती डॉ. अशोक मुंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे अध्यक्ष तथा माजी मंत्री व खासदार मा. अनंतराव देशमुख होते. प्रमुख मान्यवर म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. ज्योतीताई गणेशपुरे, प्रयोगशील शेतकरी विजय काळे यांची उपस्थिती लाभली. तांत्रिक मार्गदर्शन सत्रामध्ये डॉ. रवींद्र काळे, कृषी संशोधन केंद्र, वाशिमचे प्रभारी शास्त्रज्ञ डॉ. बी. डी. गीते, तसेच राजेश डवरे व तुषार देशमुख, तालुका कृषी अधिकारी कारंजा अश्विनी भोसले, माविमचे व्यवस्थापक शेखर खोडके व राशी प्रा. लि. चे व्यवस्थापक अंकुश जाधव यांचीही उपस्थिती होती. प्रास्ताविकात डॉ. रवींद्र काळे यांनी विशेष कापूस प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध तांत्रिक उपक्रमांची सविस्तर माहिती देत अतिघनता लागवड पद्धती, एकात्मिक पोषण व्यवस्थापन, एकात्मिक कीड व्यवस्थापन सुधारित वाणांचा वापर व यांत्रिकीकरण यामुळे उत्पादन खर्चात बचत होऊन प्रति हेक्टर उत्पादन व निव्वळ उत्पन्नात लक्षणीय वाढ झाल्याचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून स्पष्ट केले. उद्घाटनप्रसंगी डॉ. अशोक मुंदे यांनी कारंजा तालुक्यात कृषी विज्ञान केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक करून भविष्यात तालुकास्तरावर उपकेंद्र स्थापन करण्याची आवश्यकता व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात मा. अनंतराव देशमुख यांनी वाशिम जिल्हा हा आकांक्षी जिल्हा असल्याचे नमूद करून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब, शेतमाल प्रक्रिया व मूल्यवर्धन, तसेच शाश्वत शेती व्यवस्थापनाद्वारे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. सौ. ज्योतीताई गणेशपुरे यांनी महिला शेतकरी व कृषी सखी यांच्या सक्षमीकरणासाठी तांत्रिक प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रयोगशील शेतकरी विजय काळे यांनी कारंजा तालुक्यात कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार वाढविण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राच्या तालुका स्तरावरील विस्ताराची गरज व्यक्त केली. तांत्रिक सत्रामध्ये तुषार देशमुख यांनी विशेष कापूस प्रकल्पातील अतिघनता लागवड व्यवस्थापनाचे उद्दिष्ट, शास्त्रीय तत्त्वे व सद्यस्थिती यावर माहिती दिली. राजेश डवरे यांनी कापूस पीक संरक्षण तंत्रज्ञान, कीडनियंत्रणातील जैविक उपाययोजना व कीडनाशकांच्या शास्त्रोक्त वापराबाबत मार्गदर्शन केले. पान क्रं. २ वर

## कृषी विज्ञान केंद्र येथे जागतिक महिला दिन साजरा




कृषी विज्ञान केंद्र व पिरॅमिड स्पिरिच्युल सोसायटीज मुव्हमेंट, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन दि. ८ मार्च २०२६ रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश महिलांचे सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक सशक्तीकरण, पोषण सुरक्षा आणि मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करणे हा होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या विश्वस्त सौ. जयश्रीताई अनंतरावजी देशमुख या होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणून पिरॅमिड स्पिरिच्युल सोसायटीज मुव्हमेंट, महाराष्ट्रच्या प्रमुख देवयानी नवगजे, करडा गावच्या सरपंच गंगाताई देशमुख, संस्थेच्या विश्वस्त शिलाताई उकळकर, कीटकशास्त्रज्ञ आर. एस. डवरे, पशुविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ मयूर देशमुख, गृहविज्ञान शाखेच्या प्रमुख शुभांगी वाटाणे तसेच लेखापाल आर. व्ही. कोठाळे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रास्ताविकात गृहविज्ञान शाखेच्या प्रमुख शुभांगी वाटाणे यांनी जागतिक महिला दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना महिलांचे समाज व कुटुंब व्यवस्थेमधील योगदान, त्यांचे हक्क, लैंगिक समानता आणि सर्वांगीण सशक्तीकरण या बाबींविषयी जागरूकता निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात सौ. जयश्रीताई अनंतरावजी देशमुख यांनी महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देत महिलांनी स्वतःचे व कुटुंबाचे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी पोषण परसबाग उभारण्यावर भर द्यावा, तसेच संतुलित व पोषक आहाराचा अवलंब करावा असे आवाहन केले. याशिवाय मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी ध्यान व योगसाधनेचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी महिलांचे सशक्तीकरण हे समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूलभूत आधार असल्याचे सांगितले. महिलांना समान संधी, सन्मान आणि अधिकार मिळाल्यास समाज अधिक प्रगत आणि समृद्ध होतो, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी कीटकशास्त्रज्ञ आर. एस. डवरे यांनी शाश्वत व सुरक्षित अन्न उत्पादनासाठी सेंद्रिय शेती तसेच एकात्मिक शेती पद्धती यांचा अवलंब करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच देवयानी नवगजे यांनी मानसिक व शारीरिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी ध्यान या वैज्ञानिक पद्धतीचे महत्त्व स्पष्ट केले. ध्यानामुळे मानसिक शांतता मिळते, एकाग्रता वाढते, तणाव व चिंता कमी होतात, सकारात्मक ऊर्जा निर्माण होते तसेच भावनिक संतुलन राखण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. यानंतर त्यांनी उपस्थितांना ध्यानाचे प्रात्यक्षिकही करून दाखविले. या कार्यक्रमास परिसरातील महिला, युवक-युवती तसेच विविध महिला बचत गटांच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विज्ञान केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून विशेष परिश्रम घेतले.

## विकसित भारत - जी-राम-जी अभियानांतर्गत हिवरा गणपती येथे जी-राम जी मिशनवर कृषी विज्ञान केंद्राव्दारे मार्गदर्शन




कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने मौजे हिवरा गणपती येथे गावाचे सरपंच मा. श्री. विनोदराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली विकसित भारत – जी–राम–जी (ग्रामीण समृद्धी व रोजगार हमी अभियान) अंतर्गत जी–राम–जी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित शेतकरी व ग्रामस्थांना कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने डॉ. डी. एन. इंगोले यांनी जी–राम–जी मिशन विषयी सविस्तर, तांत्रिक व शास्त्रीय मार्गदर्शन केले. त्यांनी स्पष्ट केले की, ही योजना केंद्र शासनाची एक नवीन व महत्त्वाकांक्षी पहल असून, तिचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती, उत्पन्नवाढ, महिला सक्षमीकरण आणि शाश्वत ग्रामीण विकास साधणे हा आहे. या मिशनअंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा अंतर्गत कामे अधिक व्यापक व प्रभावी पद्धतीने राबविण्यात येणार असून, किमान १२५ दिवसांचा रोजगार, तसेच वेळेवर मजुरी भरणा अनिवार्य करण्यात आला आहे. वेळेवर मजुरी न दिल्यास संबंधित मजुरांना व्याजासह अतिरिक्त मोबदला देण्याची स्पष्ट तरतूद या योजनेत आहे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने, एकूण कामांपैकी किमान ३३ टक्के कामे महिलांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक असून, त्यामुळे ग्रामीण महिलांना आर्थिक स्वावलंबन प्राप्त होण्यास मोठी मदत होणार आहे. जी–राम–जी मिशनची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे ग्रामपंचायत व ग्रामसभेचा सक्रीय सहभाग, ग्रामपंचायत विकास आराखडा व ग्रामसभा आधारित नियोजन, सर्वसमावेशक दृष्टिकोन – विविध सरकारी योजनांचा एकत्रित समन्वय, ग्रामीण भागातील सर्व घटकांपर्यंत लाभ पोहोचविणे व राज्यांना अतिरिक्त निधी प्राप्त होण्याची संधी. या योजनेअंतर्गत पशुपालन विकास, ग्रामीण पायाभूत सुविधा, जलसंधारण व पाणी बचत, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, तसेच शाश्वत व पर्यावरणपूरक विकासाची कामे ग्रामसभा व ग्रामपंचायत स्तरावर प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत. सदर कार्यक्रमासाठी हिवरा गणपती येथील बहुसंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावरून ग्रामीण विकास व विकसित भारताच्या संकल्पनेबाबत जनतेमध्ये असलेली सकारात्मक जाणीव स्पष्टपणे दिसून आली.

**पान क्रं. १ वरुन** अश्विनी भोसले यांनी शेतकरी हिताच्या विविध शासकीय प्रोत्साहन योजनांची माहिती दिली. अंकुश जाधव यांनी संशोधित कपाशी वाणांची वैशिष्ट्ये व उत्पादन क्षमता यावर प्रकाश टाकला. मनोगत व्यक्त करताना प्रयोगशील शेतकरी रितेश पांढर यांनी कोरडवाहू परिस्थितीत सघन कापूस लागवड तंत्रज्ञान फायदेशीर ठरत असल्याचे अनुभवातून सांगितले. इतर शेतकऱ्यांनीही या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान प्रयोगशील शेतकरी जगन्नाथ सरकटे यांना तूर पिक वाणाचे स्वामित्व प्रदान झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच रितेश पांढर व रणजीत देशमुख यांना कापूस पीक उच्च उत्पादन तंत्रज्ञान प्रसार व बीज उत्पादन कार्यासाठी कृषक सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अक्षय गिरी, प्रवीण जाधव व पवन सरनाईक यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कृषी संशोधन केंद्रात शेतकरी-शास्त्रज्ञ मंच सभा व शिवार फेरी



डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत कृषी संशोधन केंद्र, वाशिम व कृषी विज्ञान केंद्र, वाशिम, कृषी विभाग व आत्मा यांच्या संयुक्त सहकार्याने शेतकरी–शास्त्रज्ञ मंच सभा व शिवार फेरी कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी कृषी संशोधन केंद्र, वाशिम येथील प्रक्षेत्रावर करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वाशिम श्री. आरिफ शहा, प्रकल्प संचालक, आत्मा सौ. अनिसा महाबळे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. आर. एल. काळे, केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. बी. डी. गीते, श्री. संजय उकळकर, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. संतोष वाळके, मत्स्य विभागाच्या सौ. झापे, तसेच प्रगतशील शेतकरी श्री. दिलीप फुके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. स्वागतानंतर प्रास्ताविकात डॉ. बी. डी. गीते यांनी शेतकरी–शास्त्रज्ञ मंच उपक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट करत कृषी विद्यापीठामार्फत शिफारस करण्यात आलेल्या खरीप, रब्बी व उन्हाळी पिकांच्या उत्पादनवाढीसाठीच्या आधुनिक व शाश्वत तंत्रज्ञानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी फळबाग तज्ञ श्री. निवृत्ती पाटील यांनी संत्रा बाग व्यवस्थापनातील शास्त्रीय बाबी, चालू हंगामात बागेत आढळणाऱ्या समस्या व त्यावरील तांत्रिक उपाय याविषयी सखोल माहिती देऊन शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान केले. तसेच कीटकशास्त्रज्ञ श्री. राजेश डवरे यांनी जैविक निविष्ठांचा शास्त्रोक्त व परिणामकारक वापर यावर मार्गदर्शन केले.श्री. संजय उकळकर यांनी ग्रामीण युवकांनी शेती क्षेत्रात सक्रिय सहभाग घ्यावा यासाठी जैविक, पर्यावरणपूरक व शाश्वत शेती पद्धती काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करून शेतकऱ्यांनी शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शेती करण्याचे आवाहन केले. प्रगतशील शेतकरी श्री. दिलीप फुके यांनी त्यांच्या शेतातील नाविन्यपूर्ण प्रयोगांची माहिती देत चिया पिकासारख्या नव्या पिकांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून दिल्याबद्दल शासकीय यंत्रणांचे आभार मानले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. आरिफ शहा यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देत, शेती क्षेत्रात मूलभूत बदल होत असल्याचे नमूद केले. शेतकऱ्यांनी नवीन पीक पद्धती, मूल्यवर्धन व बाजारपेठ व्यवस्थापन स्वीकारून दरडोई उत्पन्न वाढवावे असे आवाहन केले. डॉ. आर. एल. काळे यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देत, अलीकडेच पारित झालेल्या 'जी–राम–जी' विधेयकाच्या तरतुदी, उद्दिष्टे व शेतकऱ्यांसाठी उपलब्ध संधी याविषयी सविस्तर प्रबोधन केले व शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या सेवांचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन केले. तांत्रिक सत्रानंतर आयोजित शिवार फेरी दरम्यान कृषी संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावरील नवीन संशोधित पिकांच्या वाणांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यामध्ये गहू ,ज्वारी, मका, काबुली हरभरा राळा, जवस, तूर या पिकांचा समावेश होता. कार्यक्रमास दत्तक गावांतील शेतकरी, विस्तार यंत्रणेतील अधिकारी–कर्मचारी तसेच ग्रामीण युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. एस. के. देशमुख यांनी केले.

## नाविन्यपूर्ण औषधी वनस्पती आळीव पिकास कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथील शास्त्रज्ञांची प्रत्यक्ष भेट व तांत्रिक पाहणी

मालेगाव तालुक्यालगत असलेल्या चिवरा (ता. मालेगाव) येथील प्रगतशील शेतकरी श्री. रामप्रसाद शिरसागर यांनी मागील एक वर्षापासून नाविन्यपूर्ण औषधी वनस्पती आळीव या पिकाची यशस्वी लागवड केली आहे. सदर पिकाची कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉक्टर आर एल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. डिगंबर इंगोले यांनी दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष शेतभेट देऊन तांत्रिक पाहणी व शेतकऱ्यांशी सखोल चर्चा केली. या भेटीदरम्यान झालेल्या चर्चेतून असे निदर्शनास आले की आळीव हे पीक गहू, हरभरा व तूर यांसारख्या पारंपरिक रब्बी पिकांसाठी एक उत्तम, शाश्वत व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पर्यायी पीक ठरत आहे. विशेष म्हणजे या पिकास केवळ एक ते दोन पाण्याच्या पाळ्यांची आवश्यकता असून अत्यंत कमी पाण्यात वाढणारे पीक असल्यामुळे ते पाण्याच्या मर्यादित उपलब्धतेच्या परिस्थितीतही यशस्वीरीत्या घेता येते. आळीव हे पीक रब्बी हंगामातील असून कमी खर्चात लागवड होणारे, तसेच चोपण व मध्यम प्रतीच्या जमिनीत अधिक अनुकूल असल्याचे शास्त्रीय निरीक्षणातून स्पष्ट झाले आहे. वाशिम जिल्ह्यातील रिसोड, मालेगाव व वाशिम या तीन तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर चोपण स्वरूपाच्या जमिनी उपलब्ध असून, या जमिनीत आळीव पिकाची लागवड मोठ्या प्रमाणावर करता येण्याची दाट शक्यता आहे. या पिकासाठी एकरी बियाण्याचे प्रमाण २ ते ३ किलो इतके असून, रासायनिक खतांचा वापरही अत्यंत मर्यादित असून केवळ २५ ते ३० किलो प्रति एकर इतक्या अल्प प्रमाणात खतांचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे उत्पादन खर्च लक्षणीयरीत्या कमी येतो. पिकाची काढणी हार्वेस्टरद्वारे किंवा पारंपरिक हात कापणीद्वारे सहज करता येते. महत्त्वाची बाब म्हणजे आळीव पिकास कोणत्याही प्रकारच्या वन्यप्राण्यांचा त्रास होत नाही, तसेच आतापर्यंत कोणत्याही प्रमुख कीड व रोगांचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही. त्यामुळे हे पीक पर्यावरणपूरक व जोखमरहित ठरत आहे. उत्पादनाच्या दृष्टीने पाहता, आळीव पिकाचे प्रति एकर उत्पादन ३ ते ५ क्विंटल इतके मिळाले आहे. सदर उत्पादनास कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशिम येथे ७,३०० ते १०,६०० प्रति क्विंटल इतका समाधानकारक बाजारभाव प्राप्त झाला. यावरून या पिकास वाशिम जिल्ह्यात स्थिर व शाश्वत बाजारपेठ उपलब्ध असल्याचे स्पष्ट होते. भेटीदरम्यान झालेल्या चर्चेत शेतकऱ्यांनी असे नमूद केले की, आळीव हे पीक कमी खर्चिक, अधिक नफा देणारे, पाण्याच्या दृष्टीने किफायतशीर तसेच कीड-रोगमुक्त असल्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणावर स्वीकारले जाण्याची क्षमता असलेले पीक आहे. जर या पिकाचा कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठ यांच्या माध्यमातून शास्त्रीय पद्धतीने प्रचार व प्रसार करण्यात आला, तर वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आळीव हे एक नाविन्यपूर्ण, शाश्वत व विश्वासार्ह पर्यायी पीक म्हणून निश्चितच उपलब्ध होऊ शकते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस हातभार लावू शकते.

## कृषी विज्ञान केंद्राद्वारे अन्न प्रक्रिया उद्योगासाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न



कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व कृषी विभाग, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन योजनेअंतर्गत क्षमता बांधणी व अन्न प्रक्रिया उद्योग या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक ७ ते ९ जानेवारी २०२६ दरम्यान विधाता प्रशिक्षण सभागृह, वाशिम येथे यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजक, युवक, महिला व शेतकऱ्यांना तांत्रिक, व्यावसायिक तसेच उद्योजकता विकास विषयक सखोल व शास्त्रीय मार्गदर्शन देणे हा होता. या कार्यक्रमात हीना शेख, उपसंचालक कृषी विभाग, वाशिम तसेच जिल्हा नोडल अधिकारी, यांनी योजनेची उद्दिष्टे, लाभार्थी निवड प्रक्रिया, अनुदान व कर्ज संलग्नता तसेच शासकीय सहकार्याच्या विविध बाबींची सविस्तर व वस्तुनिष्ठ माहिती दिली. डॉ. सुधीर देशमुख, प्रशिक्षण जिल्हा नोडल अधिकारी व ईडीपी प्रशिक्षक यांनी अन्न प्रक्रिया उद्योगातील उदयोन्मुख व्यवसाय संधी, शेतीमालाचे मूल्यवर्धन, बाजारपेठ व्यवस्थापन, विपणन धोरणे तसेच उद्योजकतेच्या विविध शास्त्रीय पैलूंवर मार्गदर्शन केले. यावेळी वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की योजना ही ग्रामीण भागातील युवक, महिला व शेतकऱ्यांसाठी शाश्वत स्वयंरोजगार निर्मितीची प्रभावी संधी असून अन्न प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून शेतीमालाला योग्य दर, गुणवत्तापूर्ण मूल्यवर्धन व व्यापक बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. कृषी विज्ञान केंद्रामार्फत तांत्रिक प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती, उद्योजकता मार्गदर्शन व सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. शुभांगी वाटाणे, प्रमुख, गृहविज्ञान व जिल्हा प्रशिक्षक यांनी अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण अन्न सुरक्षा मानके, पॅकेजिंग, ब्रँडिंग तसेच महिलांसाठी उपलब्ध व्यवसाय संधी यावर सखोल व तांत्रिक माहिती दिली. तसेच अर्चना कदम, ईडीपी प्रशिक्षक यांनी उद्योग व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, खर्च-उत्पन्न विश्लेषण व यशस्वी उद्योजक होण्यासाठी आवश्यक कौशल्य विकासावर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाच्या अंतिम दिवशी सहभागी लाभार्थ्यांसाठी मंगरूळपीर तालुक्यातील मौजे मानोली येथील योजनेचे लाभार्थी श्री. विशाल माहुलकर यांच्या 'व्यंकटेश ऑईल मिल' या युनिटला प्रत्यक्ष भेट आयोजित करण्यात आली.

## कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचा पशु-पक्षी प्रदर्शन व शेतकरी मेळाव्यात सहभाग

दि. ५ मार्च २०२६ रोजी केशव नगर, ता. रिसोड येथे पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद वाशिम व पंचायत समिती, रिसोड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुख्य पशु-पक्षी प्रदर्शन व शेतकरी मेळावा कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांचा सक्रिय सहभाग नोंदविण्यात आला. या कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने पशुसंवर्धन विषयक आधुनिक व वैज्ञानिक तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक व माहितीपर प्रदर्शन स्टॉल उभारण्यात आले. या स्टॉलद्वारे वैज्ञानिक पशुधन व्यवस्थापन, संतुलित पशुखाद्य व पोषण व्यवस्थापन, पशुधन आरोग्य व रोग प्रतिबंधक उपाययोजना तसेच एकात्मिक शेती पद्धतीतील पशुधन घटकांचे महत्त्व याबाबत शेतकरी व पशुपालकांना सविस्तर माहिती देण्यात आली. सदर स्टॉलचे संचालन मयूर देशमुख, विषय विशेषज्ञ (पशु विज्ञान) यांनी केले. त्यांनी उपस्थित शेतकरी व पशुपालकांना पशुपालनातील आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित व्यवस्थापन पद्धती, पशुधन उत्पादनक्षमता वाढविण्याचे उपाय व पशुधन आधारित व्यवसायातून उत्पन्नवाढीच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान डॉ. रवींद्र काळे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांनी उपस्थित शेतकरी व पशुपालकांशी संवाद साधून वैज्ञानिक पशुपालन पद्धतींचा अवलंब, पशुधन पोषण व्यवस्थापन, रोग प्रतिबंधक लसीकरण तसेच एकात्मिक शेती प्रणालीमध्ये पशुधनाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी पशुपालन व्यवसाय हा शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी व शेती व्यवस्थेच्या शाश्वततेसाठी महत्त्वाचा पूरक व्यवसाय असल्याचे नमूद केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राम देशमुख, शिवाजी इडोळे व प्रवीण जाधव यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी, पशुपालक व ग्रामीण युवकांनी भेट देऊन कृषी विज्ञान केंद्राच्या स्टॉलमधील माहितीचा लाभ घेतला

## गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक कांदा बीज व हळद पिकांची शिवार फेरी व तांत्रिक चर्चा सत्र यशस्वीपणे संपन्न



वाशिम जिल्ह्यात नैसर्गिक शेती पद्धतीचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या सातत्याने वाढत असून, गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक शेती तंत्रज्ञान विविध पिकांमध्ये यशस्वी ठरत असल्याचे प्रत्यक्ष शेतस्तरावर दिसून येत आहे. मातीची सेंद्रिय कर्ब पातळी वाढवणे, सूक्ष्मजीव क्रियाशीलता सुधारणे तसेच पीक उत्पादनाची गुणवत्ता व शाश्वतता वाढवणे या दृष्टीने ही पद्धत उपयुक्त ठरत आहे. वाशिम जिल्ह्यातील मौजे भर जहागीर, तालुका रिसोड येथे सुमारे ४० ते ४५ शेतकरी मागील हंगामापासून हळद व कांदा बीज ही उद्यानविद्या पिके गोकृपा अमृत नैसर्गिक शेती पद्धतीवर आधारित घेत असून, हे उपक्रम कृषी विज्ञान केंद्रा अंतर्गत उद्यानविद्या तज्ज्ञ श्री. निवृत्ती पाटील यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली तसेच जय भवानी नैसर्गिक शेती गटाचे पुढाकारकर्ते श्री. रामकिशन चोपडे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे राबविले जात आहेत. याच अनुषंगाने जय भवानी नैसर्गिक शेती गटाच्या वतीने दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक शेती पद्धती या विषयावर शिवार फेरी व तांत्रिक चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उद्यानविद्या तज्ज्ञ श्री. निवृत्ती पाटील उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी श्री. रामकिशन चोपडे हे होते. यावेळी नवचैतन्य गोकृपा अमृत परिवाराचे श्री. गोविंद देशमुख, श्री. सुशांत आटोळे, श्री. दीपक बुधवंत व श्री. गोपाल सुलताने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात शेतकरी श्री. अनिल काळदाते, श्री. गजानन कोकरणे, श्री. रामेश्वर तायडे आदींच्या हळद व कांदा बीज पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पीक स्थिती, वाढ, रोग-कीड व्यवस्थापन व उत्पादन क्षमतेबाबत निरीक्षण नोंदविण्यात आले. तांत्रिक मार्गदर्शन सत्रात श्री. निवृत्ती पाटील यांनी गोकृपा अमृत नैसर्गिक शेती पद्धतीचे वैज्ञानिक महत्त्व स्पष्ट करताना माती सक्षम तर पीक सक्षम या संकल्पनेवर भर दिला. यासोबतच कांदा बीज व हळद पिकांचे पुढील हंगामी नियोजन, खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन व उत्पादन दर्जा सुधारणा या बाबींवर तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी श्री. सुशांत आटोळे यांनी सेंद्रिय उत्पादनांच्या बाजारपेठीय मागणीच्या पार्श्वभूमीवर सेंद्रिय प्रामाणिकरण ची गरज अधोरेखित करत, नवचैतन्य शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सेंद्रिय प्रामाणिकरण मोहिमेत अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. रामकिशन चोपडे यांनी जय भवानी नैसर्गिक शेती गटाच्या माध्यमातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत गोकृपा अमृत आधारित नैसर्गिक शेती पद्धती व देशी गोपालनाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन दिले.

## बिटोडा (भोयर) येथे कृषी व कृषीआधारित उद्योगांवर शास्त्रीय कार्यशाळा व चर्चासत्र-



कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने बिटोडा (भोयर) येथे कृषीविषयक अद्ययावत व शास्त्रीय माहिती, कृषीआधारित उद्योग, पोकरा अंतर्गत शेतकऱ्यांना उपलब्ध असलेले विविध लाभ तसेच 'जी-राम-जी विधेयक' संदर्भातील मार्गदर्शनासाठी विशेष कार्यशाळा व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.रविंद्र काळे होते. कार्यक्रमास मुंबई येथील आरोग्य दूत मा. श्री. रविभाऊ राठोड यांनी विशेष उपस्थिती दर्शविली. प्रमुख अतिथी म्हणून श्री.संजय उकळकर, कृषी उपसंचालक कु. हिना शेख तसेच उपविभागीय कृषी अधिकारी श्री. संतोष वाळके उपस्थित होते. मार्गदर्शक म्हणून डॉ. बी. डी. गिते, डॉ. एस. के. देशमुख, श्री. निवृत्ती पाटील, श्री. सचिन कांबळे, श्री. राजेश डवरे व श्री. मयूर देशमुख यांनी सहभाग घेतला. प्रास्ताविकात प्रा. श्री. देविदास भोंयर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करत शेतकऱ्यांनी शासकीय योजना, तंत्रज्ञान व कृषीआधारित उद्योगांविषयी अद्ययावत माहिती आत्मसात करणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. रविंद्र काळे यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध तंत्रविस्तार उपक्रमांची माहिती दिली. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादनवाढ साध्य करताना शेती कमी खर्चिक, शाश्वत व उद्योगाभिमुख बनवणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान श्री. संतोष वाळके यांनी पोकरा टप्पा-२ योजनेची उद्दिष्टे, तरतुदी व लाभांची सविस्तर माहिती दिली. ग्राम कृषी विकास समितीचे महत्त्व अधोरेखित करत शाश्वत, समन्वित व हवामान-अनुकूल शेती पद्धती स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले. तालुका कृषी अधिकारी, मंगरूळपीर श्री. सचिन कांबळे यांनी शेती विकासासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. मा. श्री. रविभाऊ राठोड यांनी निरोगी जीवनशैली, संतुलित आहार व आरोग्य संवर्धनाबाबत मार्गदर्शन करत आरोग्यदायी शेती व मानवी आरोग्य यांचा घनिष्ठ संबंध स्पष्ट केला. कु. हिना शेख यांनी शेती क्षेत्रातील सद्यस्थितीचा आढावा घेत शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध लाभदायक योजनांची माहिती दिली. कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ श्री. निवृत्ती पाटील, श्री. राजेश डवरे व श्री. मयूर देशमुख यांनी शाश्वत शेती पद्धती, एकात्मिक पीक संरक्षण, पशुसंवर्धन व कृषी विस्तार याबाबत शास्त्रीय मार्गदर्शन केले. डॉ. एस. के. देशमुख यांनी 'जी-राम-जी विधेयक' अंतर्गत शेतकऱ्यांचे हक्क, संधी व दीर्घकालीन लाभ यांची माहिती दिली. तसेच श्री राजूभाऊ पडघान व त्यांचा महादेव ग्रुप, बिटोडा (भोयर) व समस्त गावकरी यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमास परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक कृषी अधिकारी श्री. वैभव इंगळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. श्री. देविदास भोंयर यांनी केले.

## जऊळका रेल्वे येथे मका उत्पादन व काढणी पश्चात तंत्रज्ञानावर प्रशिक्षण व चर्चासत्र संपन्न



भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कुत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी जऊळका रेल्वे येथील श्री. हरिदास ढोके यांच्या शेतामध्ये मका उत्पादन व काढणी पश्चात तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. हरिदास गोविंदा ढोके होते. प्रमुख मार्गदर्शक वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम – डॉ. आर. एल. काळे, तसेच अर्थशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर इंगोले, पशु विज्ञान तज्ञ श्री. मयूर देशमुख व कृषी विभागाचे कृषी सहाय्यक श्री. आंधळे हे होते. प्रास्ताविकात डॉ. दिगंबर इंगोले यांनी कार्यक्रमाची उद्दिष्टे व रूपरेषा स्पष्ट केली. जऊळका रेल्वे परिसरात सुमारे १०० हेक्टर क्षेत्रावर बिजोत्पादनासाठी मक्याची लागवड झालेली असून, उत्पादन तंत्रज्ञानासोबतच काढणी पश्चात तंत्रज्ञान या बाबतीत शेतकऱ्यांची वाढती गरज लक्षात घेऊन कृषी विज्ञान केंद्रामार्फत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच यावेळी त्यांनी यांनी 'जी–राम–जी विधेयक' अंतर्गत शेतकऱ्यांचे हक्क, संधी व दीर्घकालीन लाभ यांची माहिती दिली. तांत्रिक मार्गदर्शन करताना डॉ. रविंद्र काळे यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध तंत्रविस्तार उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादनवाढ साध्य करताना शेती कमी खर्चिक, शाश्वत व उद्योगाभिमुख बनवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. शेतमाल मूल्यवर्धनावर आधारित प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्या व कृषी उद्योजकता विकास यांच्या माध्यमातून शेतीला उद्योगाचा दर्जा देऊन व्यावसायिक दृष्टिकोनातून उत्पादन घेण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले. श्री. मयूर देशमुख यांनी मक्याची कुट्टी करून सायलेज निर्मितीची शास्त्रीय पद्धत, योग्य ओलावा नियंत्रण, साठवणूक तंत्र व पोषणमूल्य वाढविण्याचे उपाय स्पष्ट केले. हिवाळी काळात जनावरांना कोरडा–ओला संतुलित चारा, स्वच्छ पाणी, निवाऱ्यात उबदार व्यवस्था तसेच रोगप्रतिबंधक लसीकरण यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. या तंत्रज्ञानामुळे वर्षभर दर्जेदार चारा उपलब्ध होऊन दूध उत्पादनात वाढ व खर्चात बचत साध्य होईल, असे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात श्री. हरिदास ढोके यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत उपलब्ध तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांनी प्रभावीपणे वापर करून कृषी विकास साधावा, तसेच शेतीपूरक उद्योग व जोडधंदे उभारून शेतीतील खर्च कमी करण्याचे आवाहन केले. श्री.आंधळे यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देत, तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीला उद्योगाचे स्वरूप देण्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जऊळका रेल्वे शेतकरी उत्पादक कंपनीचे सर्व संचालक व सभासद यांनी कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता अधिक परिश्रम घेतले तसेच मैराडोह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अंकुश पोदाडे, सागर बळी व अमोल बळी यांच्या मका पिकाची पाहणी करून तांत्रिक चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र भिकाजी सुळके तर आभार प्रदर्शन श्री दत्ता काळे यांनी केले.

## कपाशी अतीघनता लागवड : उत्पादनवाढ, मृदा आरोग्य आणि शाश्वत शेतीसाठी प्रभावी तंत्र



भारतीय कृषी संशोधन परिषद अंतर्गत कृषी प्रौद्योगिकी अनुसंधान संस्था, पुणे व केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या सहकार्याने तसेच कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या पुरस्कृत विशेष कापूस पीक प्रकल्प अंतर्गत आधुनिक पिकतंत्रज्ञान विस्तार कार्यक्रमाचे आयोजन सुविदे फाउंडेशन व कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या अंतर्गत दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी मौजे म्हसला, ता. कारंजा येथे कापूस पीक तंत्र शेतीदिन यशस्वीरित्या संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रवींद्र काळे प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम होते. प्रमुख अतिथी म्हणून सौ. कल्पना राजेंद्र काळे (सरपंच), सौ. संगीता धम्मदीप (उपसरपंच), सौ. वंदना घोडासळ (पोलीस पाटील), सौ. शीतलताई सरोदे व श्री. सिद्धार्थ तायडे आदी मान्यवर उपस्थित होते. तांत्रिक मार्गदर्शनासाठी डॉ. सुधीर देशमुख (विस्तार तज्ञ), श्री. तुषार देशमुख (प्रकल्प अधिकारी) व सौ. मुसळे (कृषी सेविका) उपस्थित होते. डॉ. सुधीर देशमुख यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना व स्वागत करताना विशेष कापूस पीक प्रकल्पातील प्रात्यक्षिकांद्वारे उत्पादनक्षमता वाढ, मृदा आरोग्य संवर्धन व शाश्वत शेती यासाठी आवश्यक तांत्रिक सल्ला दिला. तसेच विकसित भारत – जीरामजी अभियान २०२५ ची उद्दिष्टे, तरतुदी व शेतकऱ्यांसाठी असलेल्या संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. रवींद्र काळे यांनी केव्हीके वाशिममार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध तंत्रविस्तार उपक्रमांची माहिती देत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उत्पादनवाढीसोबतच शेतीला कमी खर्चिक, शाश्वत व उद्योगाभिमुख बनवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. तसेच शेतमाल मूल्यवर्धनावर आधारित प्रक्रिया उद्योग व शेतकरी गट उद्योग उभारणी ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. यावेळी त्यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या जैविक निविष्ठा प्रयोगशाळेत उपलब्ध ट्रायकोडर्मा व इतर जैविक कल्चरचा वापर करून मृदा आरोग्य सुधारणा, तसेच अधिक कपाशी उत्पादनासाठी पराटी श्रेडरद्वारे कुट्टी करून सेंद्रिय कर्ब व्यवस्थापन तंत्राचा अवलंब करण्याचे आवाहन केले. प्रकल्प अधिकारी श्री. तुषार देशमुख यांनी हलकी ते मध्यम प्रतीच्या जमिनीत सुधारित अतीघनता कपाशी लागवड पद्धती अवलंबून उत्पादनात लक्षणीय वाढ कशी साधता येईल यावर वैज्ञानिक विवेचन केले. कपाशी पिकानंतर रब्बी गहू पिक पद्धतीचा समन्वय, तसेच वेचणीनंतर पराटी व्यवस्थापनासाठी श्रेडर/कुट्टी यंत्र तंत्रज्ञानाचा वापर करून सेंद्रिय कर्ब वाढ व मृदा आरोग्य टिकवणे या बाबींवर विशेष भर देण्यात आला. प्रयोगशील शेतकरी श्री. किशोर हिरवे व श्री. ऋषिकेश हिरवे यांनी अतीघन कपाशी लागवडीतील प्रत्यक्ष अनुभव, उत्पादनवाढ, खर्च–नियंत्रण व तंत्रज्ञानाचे फायदे शेतकऱ्यांशी सविस्तरपणे शेअर केले. श्री. राजेंद्र काळे यांनी गाव पातळीवर विशेष कापूस प्रकल्पांतर्गत उच्च उत्पादनक्षम तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार केल्याबद्दल कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांचे कौतुक केले व हे शेतकरीहिताचे कार्य सातत्याने सुरू राहावे अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमांतर्गत तज्ज्ञ व शेतकऱ्यांनी श्री. ज्ञानेश्वर रामराव काळे यांच्या कपाशी पिकाच्या शेतास भेट देऊन प्रत्यक्ष पिक स्थिती, तंत्र अवलंब व शेतीअनुभवांचे निरीक्षण केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष कापूस प्रकल्पातील यंग प्रोफेशनल सहाय्यक श्री. अक्षय गिरी, पवन सरनाईक व श्री. प्रवीण जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## परसबागेतील शोभिवंत मत्स्य संगोपन व विक्री आदिवासी महिलांसाठी पाच दिवसीय निवासी प्रशिक्षण



सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, यवतमाळ व कृषी विज्ञान केंद्र, यांच्या संयुक्त विद्यमाने, जिल्हा वार्षिक योजना तसेच मा. प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांच्या मार्फत अर्थसहाय्यित नाविन्यपूर्ण योजना अंतर्गत परसबागेतील शोभिवंत मत्स्य संगोपन व विक्री या प्रकल्पासाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांसाठी निवासी प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक २९ डिसेंबर २०२५ ते ०२ जानेवारी २०२६ या कालावधीत कृषी विज्ञान केंद्र, येथे यशस्वीरीत्या पार पडला. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये डॉ. आर. एल. काळे, प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम, श्रीमती अमिता जैन, सहाय्यक मत्स्य विकास अधिकारी, अमरावती, तसेच श्रीमती शुभांगी वाटाणे, यांनी शोभिवंत मत्स्य टाकीची वैज्ञानिक पद्धतीने निर्मिती, टाकीचे सुशोभीकरण, पाण्याच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन, आहार व्यवस्थापन, रोग प्रतिबंध व नियंत्रण, रंगीत माशांच्या निवड व संगोपन तंत्रज्ञान, तसेच उत्पादन खर्च व नफा विश्लेषण याबाबत सविस्तर व प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून सहभागी महिलांसाठी पानझडे फिश शॉप, वाशिम येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी श्री. पानझडे यांनी आपल्या पंतप्रधान मत्स्यसंपदा प्रकल्पाच्या माध्यमातून उभारलेल्या एक्वेरियम शॉपीची संकल्पना, सुरुवात, कार्यपद्धती तसेच उपलब्ध सेवा व सुविधा यांची माहिती दिली. यासोबतच रंगीत माशांचे प्रजनन, संवर्धन, साठवण, वाहतूक व स्थानिक तसेच प्रादेशिक बाजारपेठेशी असलेली जोडणी या सर्व बाबींच्या माध्यमातून हा व्यवसाय कशा प्रकारे स्वयंरोजगार व शाश्वत उत्पन्नाचे प्रभावी साधन ठरू शकतो, याबाबत सविस्तर विवेचन करण्यात आले. प्रशिक्षणात गावातील एकूण नऊ आदिवासी महिलांनी सहभाग घेतला असून त्यामध्ये कृषी सखी व मत्स्य सखी यांचा समावेश होता. हा प्रशिक्षण कार्यक्रम आदिवासी महिलांच्या तांत्रिक कौशल्यविकासासोबतच परसबागेच्या माध्यमातून पूरक उत्पन्ननिर्मिती, महिलांचे आर्थिक सबलीकरण आणि मत्स्यआधारित सूक्ष्म उद्योजकतेच्या प्रसारासाठी अत्यंत उपयुक्त ठरला. प्रात्यक्षिक यशस्वी करण्याकरिता श्री. राम देशमुख सहाय्यक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## पर्यावरणपूरक होळीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊलः कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व नगर परिषद, रिसोड यांचा संयुक्त उपक्रम



कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व नगर परिषद, रिसोड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी रिसोड येथील नगर परिषद प्रशिक्षण सभागृहात नैसर्गिक होळी रंग निर्मिती या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला. पर्यावरणपूरक, त्वचास्नेही व आरोग्यदायी होळी साजरी करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे प्रमुख डॉ. आर. एल. काळे होते. प्रमुख अतिथी म्हणून नगर परिषद, रिसोडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सतीश शेवदा उपस्थित होते. तांत्रिक मार्गदर्शन गृहविज्ञान विभाग प्रमुख कु. शुभांगी वाटाणे तसेच श्री. राजेंद्र पाट्टेभदूर यांनी केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. काळे यांनी नैसर्गिक रंगनिर्मिती ही महिला बचत गट, युवक व ग्रामीण उद्योजकांसाठी एक शाश्वत व पूरक सूक्ष्मउद्योग म्हणून विकसित होऊ शकते, असे प्रतिपादन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सतीश शेवदा यांनी रासायनिक रंगांमधील कृत्रिम रंगद्रव्ये, जड धातू व हानिकारक रसायनांमुळे त्वचारोग, ॲलर्जी व श्वसनासंबंधी समस्या उद्भवू शकतात, तसेच नैसर्गिक रंग हे जैवविघटनशील, पर्यावरणस्नेही व मानवी आरोग्यास सुरक्षित असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तांत्रिक सत्रात कु. शुभांगी वाटाणे यांनी पालक, बीट, झेंडूची फुले, हळद, गुलाब पाकळ्या इत्यादी स्थानिक स्तरावर सहज उपलब्ध वनस्पतीजन्य घटकांपासून रंगद्रव्ये काढण्याची वैज्ञानिक पद्धत समजावून सांगितली. सुक्या व ओल्या रंगांची निर्मिती करताना कच्चा माल निवड, स्वच्छता, वाळवण, दळण, गाळणी प्रक्रिया, तसेच सुरक्षित साठवण या बाबींवर सविस्तर प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. श्री. राजेंद्र पाट्टेभदूर यांनी तयार रंगांची स्वच्छ, आर्द्रतारोधक व आकर्षक पद्धतीने साठवण, पॅकिंग व लेबलिंग याबाबत मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण कार्यक्रमास रिसोड येथील महिला बचत गटातील सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## भारत विस्तार राष्ट्रीय ॲपचे लोकार्पण व राष्ट्राला समर्पण - डिजिटल कृषी परिवर्तनाकडे ऐतिहासिक पाऊल

केंद्रीय कृषि व किसान कल्याण मंत्रालय यांच्या वतीने कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित भारत विस्तार राष्ट्रीय ॲप चे उद्घाटन व राष्ट्राला समर्पण समारंभ दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी जयपूर येथून थेट प्रक्षेपित करण्यात आला. या राष्ट्रीय कार्यक्रमाचे अभासी पद्धतीने थेट प्रक्षेपण कृषि विज्ञान केंद्र, वाशिम यांचे करडा येथे शेतकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान भारत विस्तार ॲपची आवश्यकता, कार्यपद्धती व शेतकऱ्यांना मिळणारे तांत्रिक, व्यवस्थापकीय व बाजाराभिमुख लाभ याविषयी संवादात्मक चर्चा घेण्यात आली. देशातील प्रचंड शेतकरी लोकसंख्या लक्षात घेता पारंपरिक विस्तार यंत्रणा मर्यादित ठरते. या पार्श्वभूमीवर डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत त्यांच्या मातृभाषेत, त्वरित व वैज्ञानिक माहिती पोहोचविण्यासाठी हे ॲप ऐतिहासिक ठरणार आहे. हे ॲप २४ X ७ तास कार्यरत राहून हवामान अंदाज, बाजारभाव, पीक सल्ला, शासकीय योजनांची माहिती, तक्रार निवारण तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित निर्णय सहाय्य सेवा उपलब्ध करून देणार आहे. भारती या एआय-आधारित चॅटबॉटच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तत्काळ मार्गदर्शन मिळणार आहे. या कार्यक्रमात केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या शुभहस्ते तसेच राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या उपस्थितीत भारत विस्तार ॲप, कृषि कोष हॅकाथॉन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कृषी रोडमॅप राष्ट्राला समर्पित करण्यात आला. मान्यवरांनी आपल्या भाषणात नमूद केले की, डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेतकऱ्यांना २४ तास तांत्रिक सेवा उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पादनक्षमता, उत्पन्न व जीवनमानात सकारात्मक बदल घडून येईल. भारत विस्तार ॲप अँड्रॉइड मोबाईलद्वारे सहज उपलब्ध असून, जसे प्रणालीने डिजिटल व्यवहार सुलभ केले तसेच हे ॲप कृषी सेवा एकत्रितपणे उपलब्ध करून देईल. येत्या मे महिन्यापर्यंत विविध शासकीय योजना व सेवा एकत्रित करून संपूर्ण देशभर एकसंध डिजिटल कृषी सेवा प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषि विज्ञान केंद्रातील सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी वर्गाने समन्वयपूर्वक परिश्रम घेतले. हा उपक्रम डिजिटल कृषी विस्तार व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी आणि शेतकरी सक्षमीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

## कृषी विज्ञान केंद्र येथे कृषी वानिकी प्रशिक्षण व मेळावा




कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व सामाजिक वनीकरण विभाग, वाशिम (परिक्षेत्र रिसोड) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत विभागीय वन अधिकारी अशोक पऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर शेतकरी प्रशिक्षण व कृषी वानिकी मेळावा उत्साहात संपन्न झाला. दीप प्रज्वलनानंतर कार्यक्रमाची सुरुवात भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या गीताने व महाराष्ट्र गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वनपरिक्षेत्र अधिकारी अरविंद इढोळे यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटन सहाय्यक वनसंरक्षक सुशिल मंतावर यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी कृषी वानिकी ही शाश्वत शेती व्यवस्थेची प्रभावी संकल्पना असून शेतीसोबत बहुउद्देशीय वृक्षलागवड केल्यास उत्पन्नाचे विविधीकरण, मृदा व जलसंधारण, जैवविविधता संवर्धन तसेच पर्यावरण संतुलन साध्य होण्यास मदत होते, असे प्रतिपादन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. रविंद्र एल. काळे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी एकात्मिक शेती पद्धती आणि कृषी वानिकीचा समन्वय केल्यास उत्पादन खर्चात कपात, संसाधनांचा कार्यक्षम वापर व दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य साध्य होऊ शकते, असे स्पष्ट केले. तसेच रासायनिक निविष्ठांवरील अवलंबित्व कमी करून नैसर्गिक शेती तत्त्वांचा अवलंब करणे ही काळाची गरज असून शेतीकडे उद्योगदृष्ट्या पाहण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले. प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक वनसंरक्षक पद्माकर मोगरे उपस्थित होते. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र कातखेडे, संजय नंदुरकर, सुहास मोरे, राजेश घागरे तसेच प्रगतशील शेतकरी दत्ताराव इंगोले यांची विशेष उपस्थिती लाभली. तांत्रिक सत्रात कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. डिंगांबर इंगोले, राजेश डवरे, तुषार देशमुख, शुभांगी वाताणे व प्रमोद देशमुख यांनी कृषी वानिकीतील योग्य प्रजाती निवड, अंतरपिक पद्धती, लागवड व संगोपन तंत्रज्ञान, मृदा सुपीकता व्यवस्थापन तसेच एकात्मिक शेती पद्धतीविषयी वैज्ञानिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सामाजिक वनीकरण विभागाचे लेखापाल श्री. कपिल शृंगारे यांनी केले.कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक संस्थापक अध्यक्ष, भारत बांबू असोसिएशन राहुल देशमुख यांनी बांबू शेतीचा ऐतिहासिक व आर्थिक संदर्भ स्पष्ट करून बांबू आधारित मूल्यवर्धित उत्पादने, प्रक्रिया उद्योग व ग्रामीण महिला व युवकांसाठी स्वयंरोजगाराच्या संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी बांबूच्या जाती, लागवड, व्यवस्थापन व बाजारपेठेतील संधी याबाबत तांत्रिक माहिती दिली.याप्रसंगी प्रगतशील शेतकरी दिनेश राठोड, दत्तराव इंगोले यांनी त्यांच्या कार्याची माहिती देऊन शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्राद्वारे दिलेले नवीन नवीन तंत्रज्ञानाचे आत्मसात करून उत्पादनासोबत उत्पन्न वाढवावे असे आवाहन केले.कार्यक्रमानंतर करडा येथील प्रगतशील शेतकरी गोविंद देशमुख यांच्या आंबा पिकाच्या अतिघनदाट लागवड पद्धतीच्या बागेला प्रत्यक्ष भेट देण्यात आली. अवघ्या अडीच वर्षांच्या बागेतून अधिक उत्पादन व नफा कसा मिळवता येतो, याविषयी त्यांनी प्रत्यक्ष शेतावर मार्गदर्शन केले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी व महिला उपस्थित होते. शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार संजय नंदुरकर यांनी मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विज्ञान केंद्रातील व सामाजिक वनीकरण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सौ. मीना जाधव यांना 'स्वयंसिद्धा २०२६' सन्मान




आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर डॉ.पंदेकृवि,अकोला येथे आयोजित 'विदर्भस्तरीय महिला सक्षमीकरण मेळावा व स्त्रीशक्ती उत्सव' अत्यंत उत्साहात व शैक्षणिक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात विदर्भातील विविध जिल्ह्यांतील कृषी, पूरक उद्योग व ग्रामीण उद्योजकतेत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा 'स्वयंसिद्धा २०२६' पुरस्काराने गौरव करण्यात आला. या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी कृषी विज्ञान केंद्र वाशिम यांच्या वैज्ञानिक व तांत्रिक मार्गदर्शनाखाली अन्न प्रक्रिया व मूल्यवर्धन क्षेत्रात यशस्वी उद्योजक म्हणून उदयास आलेल्या रिठद येथील 'सृष्टी आईस्क्रीम व बेकरी' उद्योगाच्या संचालिका सौ. मीना गोपाल जाधव यांची निवड करण्यात आली. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे वाशिम जिल्ह्याचे नाव विद्यापीठ स्तरावर गौरवपूर्णरीत्या उजळले आहे. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ. वर्षा लड्ढा उपस्थित होत्या, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. यावेळी अकोला जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी मा. वर्षा मीना, विविध विभागांचे संचालक, शास्त्रज्ञ, कृषी तज्ञ, अधिकारी व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते सौ. जाधव यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ प्रदान करून गौरविण्यात आले.सौ. जाधव यांनी कृषी विज्ञान केंद्र, वाशिम मार्फत आयोजित अन्न प्रक्रिया, मूल्यवर्धन व उद्योजकता विकास प्रशिक्षणाचा प्रभावीपणे लाभ घेतला. वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब, गुणवत्तापूर्ण उत्पादन, स्वच्छता मानके व बाजाराभिमुख उत्पादन प्रणाली यांच्या आधारे त्यांनी 'सृष्टी आईस्क्रीम व बेकरी' हा उद्योग यशस्वीपणे विकसित केला आहे. त्यांच्या उद्योगामुळे स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती होऊन ग्रामीण महिलांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळत आहे. त्या इतर महिलांसाठी एक प्रेरणादायी आदर्श ठरत आहेत. कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे अध्यक्ष मा.अनंतरावजी देशमुख , प्रमुख डॉ. आर. एल. काळे, गृह विज्ञान प्रमुख सौ. शुभांगी वाताणे तसेच सर्व विषयतज्ज्ञांनी सौ. जाधव यांच्या यशाबद्दल अभिनंदन व्यक्त केले.

## पीएम-किसान योजनेच्या २२ व्या हप्त्याच्या वितरण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण

भारत सरकारची महत्त्वाकांक्षी योजना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत २२ व्या हप्त्याच्या वितरण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दि. १३ मार्च २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता आसाम राज्यातील गुवाहाटी येथून माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. या राष्ट्रीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कृषी विज्ञान केंद्रामार्फत बहुसंख्य शेतकऱ्यांची उपस्थिती सुनिश्चित करण्यात आली. शेतकऱ्यांनी पंतप्रधानांचे मार्गदर्शन व पीएम-किसान योजनेअंतर्गत २२ व्या हप्त्याच्या वितरणाचा कार्यक्रम थेट पाहिला. पंतप्रधानांनी आपल्या संबोधनात शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी केंद्र शासन विविध कृषी विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करीत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या निमित्ताने कृषी विज्ञान केंद्राच्या तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना डिजिटल ॲग्रीकल्चर मिशन, नैसर्गिक शेती, कडधान्य मिशन तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञान याबाबत माहिती दिली. या माध्यमातून शेतकऱ्यांना शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करून उत्पादन व उत्पादकता वाढविण्याचे आवाहन करण्यात आले.

## गोवंशाधारित नैसर्गिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास दौरा : हळद, आंबा व संत्रा पिकांतील कमी खर्चिक उत्पादन व्यवस्थापनाचा यशस्वी अनुभव

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र वाशिम व डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने दत्तक गाव शेलगाव घुगे तालुका जिल्हा वाशिम येथील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.आर.एल.काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. या दौऱ्यात शेतकऱ्यांनी बिबखेडा, करडा व वडजी तालुका रिसोड या गावांना भेट देऊन हळद, आंबा व संत्रा पिकांच्या क्षेत्रीय प्रात्यक्षिक प्लॉट्सचे निरीक्षण केले. सदर प्लॉट्समध्ये गोकृपा अमृतम आधारित गोवंशाधारित नैसर्गिक शेती पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला असून, स्थानिक संसाधनांवर आधारित कमी खर्चिक, शाश्वत व पर्यावरणपूरक उत्पादन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी प्रत्यक्ष पाहण्याची संधी शेतकऱ्यांना मिळाली. जमिनीची सुपीकता वृद्धिंगत करणे, सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता वाढविणे, रासायनिक निविष्ठांवरील अवलंबित्व कमी करणे आणि उत्पादन खर्चात बचत करणे या दृष्टीने या पद्धतीचे महत्त्व शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात आले. कृषी विज्ञान केंद्र, वाशीमचे शास्त्रज्ञ श्री. निवृत्ती पाटील यांनी अभ्यास दौऱ्याचे समन्वयन करून कमी खर्चातील उत्पादन तंत्रज्ञान, पोषक व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन तसेच नैसर्गिक शेतीतील गोकृपा अमृतम च्या वैज्ञानिक वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये शाश्वत शेती तंत्रज्ञानाविषयी जागरूकता निर्माण होऊन स्थानिक स्तरावर आत्मनिर्भर व पर्यावरणस्नेही शेती पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन मिळाले.

## शेती व ग्रामीण बदल विषयावरील वेबिनारचे कृषी विज्ञान केंद्र, करडा येथे आयोजन

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या वतीने केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ अनुषंगाने शेती व ग्रामीण बदल (Agriculture and Rural Transformation) या विषयावर दिनांक ६ मार्च २०२६ रोजी एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रमुख डॉ. आर.एल.काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या वेबिनारचे थेट प्रक्षेपण कृषी विज्ञान केंद्र, करडा येथे शेतकरी, महिला बचत गट व शेतकरी उत्पादक कंपनीच्या प्रतिनिधींसाठी आयोजित करण्यात आले. उद्घाटनपर भाषणात पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढ, विषमुक्त शेती,लखपती दीदी उपक्रम व कृषी निर्यात वाढ यासंदर्भातील केंद्र सरकारच्या धोरणांवर प्रकाश टाकला. तसेच पशुसंवर्धन मूल्य साखळी, मत्स्यपालन, नारळ व काजू विकास योजना, कृषी वानिकीतील चंदन लागवड, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित ॲप व ग्रामीण महिलांसाठी उद्योजकता विकास याबाबत तज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी केंद्रीय कृषी व ग्रामीण विकास मंत्री मा. श्री. शिवराजसिंह चव्हाण यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी चालू बजेटमध्ये युवा व ग्रामीण महिलांना केंद्रस्थानी ठेवण्यात आल्याचे सांगितले. कृषी विज्ञान केंद्र येथे आयोजित कार्यक्रमास करडा गावच्या सरपंच सौ. गंगाबाई वसंतराव देशमुख अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या. कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्रातील तज्ञ, महिला बचत गट व शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत्रा बाग व्यवस्थापन व शेतीपूरक व्यवसायांवर तांत्रिक मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

शेलगाव परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी कृषी विज्ञान केंद्र व डॉ. पंदेकृवि अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने शेलगाव घुगे येथे बुधवार, दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी रवी दादाराव घुगे यांच्या संत्रा बागेत तांत्रिक मार्गदर्शन व चर्चासत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शशिकांत गोटे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक यांनी केले. या वेळी मार्गदर्शक म्हणून प्रमुख डॉ. आर. एल. काळे, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम, डॉ. भरत दशरथ गीते, कृषी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी व उद्यानविद्या तज्ञ निवृत्ती पाटील यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमास भगवानराव घुगे (पोलीस पाटील) व कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. तांत्रिक सत्रामध्ये डॉ. गीते यांनी गहू हरभरा व हळद पिकांबाबत शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या विविध तांत्रिक प्रश्नांचे शास्त्रीय व समाधानकारक निरसन केले. डॉ. काळे यांनी एकात्मिक शेती पद्धतीचे महत्त्व विशद करत शेती उद्योगरूपाने केल्यास उत्पादन खर्चात घट होऊन निव्वळ नफ्यात लक्षणीय वाढ साध्य होऊ शकते, असे प्रतिपादन केले.फळबाग तज्ज्ञ निवृत्ती पाटील यांनी संत्रा पिकाचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन, उत्पादनवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, एकात्मिक कीड-रोग व्यवस्थापन तसेच संतुलित पोषण व्यवस्थापन याविषयी सखोल मार्गदर्शन केले. विशेषतः मागील दोन वर्षांत संत्रा पिकामध्ये आढळून येणाऱ्या ग्रेसी स्पॉट व फायटोपथोरा रोगांमुळे होणाऱ्या नुकसानीची लक्षणे, कारणे तसेच प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजनांची सविस्तर माहिती त्यांनी दिली. चर्चासत्रानंतर शास्त्रज्ञांनी रवी दादाराव घुगे यांच्या संत्रा बागेची प्रत्यक्ष पाहणी करून सद्यस्थितीतील समस्यांची ओळख केली व त्यावर शास्त्रीय उपाययोजनांचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.



**कृषी विज्ञान केंद्र, ई-त्रैमासीक बातमीपत्र**

डॉ.आर.एल.काळे (प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ) कृ.वि.के.करडा ता.रिसोड जि.वाशिम दुरध्वनी क्र.०७५१-२२६५१३ फॅक्स - ०७५१-२२२४६२ यांनी रिसोड येथे मुद्रीत करून करडा येथे प्रसिध्द केले.

wabsite - www.kvkwashim.com/emil-kvk.washim@yahoo.com

**मुख्य संपादक**
**डॉ.आर.एल.काळे**
(वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख)

**संपादक मंडळ**
डॉ.आर.एल.काळे (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख), डॉ.एस.के.देशमुख (विस्तार शिक्षण)
श्री आर.एस.डवरे (पीक संरक्षक), श्री एन.बी.पाटील (उद्यान विद्या)
श्री टि.एस.देशमुख (कृषि विद्या), डॉ.डी.एन.इंगोले (कृषि अर्थशास्त्र)
श्री एम.एस. देशमुख (पशुविज्ञान), श्री एस.आर.बावस्कर (संगणक शास्त्र),
सौ.एस.एन.वाटाणे (गृह विज्ञान), श्री प्रमोद देशमुख (प्रक्षेत्र व्यवस्थापक),

मुद्रक : जिजाऊ ग्राफिक्स,रिसोड मो.९६७३१५६०९५